# आरोग्य सेवा संचालनालय

(महाराष्ट्र राज्य)

"आरोग्य भवन", सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड,
मुंबई- ४०० ००१

क्र. आसेसं/डिएचएस पीजी पदविका २०१८/प्रवेशप्रक्रिया/अधिसूचना क्र.५ दि. ०५/०६/२०१८

## अधिसूचना

### " आरोग्य सेवा संचालनालय वैद्यकीय पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम – २०१८ अंतर्गत घेण्यात येणाऱ्या समुपदेशन सत्राच्या बदलाबाबत"

आरोग्य सेवा संचालनालय वैद्यकीय पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम – २०१८ चे सत्र वेळापत्रकानुसार दि. १२/०६/२०१८ रोजी आयोजित करण्यात आलेले होते.

परंतु डिएनबी अभ्यासक्रम –२०१८ ची समुपदेशन प्रक्रियेची अंतिम फेरी दि. १२ ते १४ जून, २०१८ रोजी नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेली आहे. सदर समुपदेशन प्रक्रियेसाठी उमेदवाराला व्यक्तीशः हजर रहावयाचे असल्याने आरोग्य सेवा संचालनालय वैद्यकीय पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम – २०१८ चे समुपदेशन सत्राच्या तारखेमध्ये बदल करण्यात आलेला आहे.

या अधिसूचनेनुसार असे कळविण्यात येते की, आरोग्य सेवा संचालनालय वैद्यकीय पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम – २०१८ चे सत्र सुधारीत वेळापत्रकानुसार दि. १९/०६/२०१८ रोजी स. ९.०० वा पासून सभागृह, तळ मजला, आरोग्य भवन, सेंट जॉर्ज हॉस्पिटल कंपाऊंड, सीएसएमटी, मुंबई येथे आयोजित करण्यात आलेले आहे.

समुपदेशन सत्रासाठी पात्र खाजगी व शासकीय सेवेतील उमेदवारांनी दिलेल्या वेळापत्रकानुसार व्यक्तीशः हजर रहावे. पात्र उमेदवारांची अंतिम यादी **www.arogya.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर लवकरच प्रसिध्द करण्यात येईल.

समुपदेशन सत्राचे वेळापत्रक खालीलप्रमाणेः

| दिनांक | वेळ | प्रक्रिया |
|---|---|---|
| १९/०६/२०१८ | स.०९.०० ते स.१०.०० | नोंदणी |
| | स.१०.०० ते समुपदेशन सत्र समाप्त होईपर्यंत. | समुपदेशन |

समुपदेशन प्रक्रियेसाठी येताना सोबत प्रवेशप्रक्रिया पुस्तिकेमध्ये नमूद आवश्यक सर्व कागदपत्रांच्या मूळ व छायांकित प्रतीसह व्यक्तीशः उपस्थित रहावे. (प्रवेशप्रक्रिया पुस्तिका **www.arogya.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.)

संवर्गनिहाय व संस्थानिहाय उपलब्ध जागांची माहिती दि. ३०/०५/२०१८ रोजीच्या अधिसूचनेप्रमाणे असेल.

सही/-
संचालक,
आरोग्य सेवा, मुंबई.